पुढारी

२ पुढारी My कोल्हापूर रविवार,

रविवार, २१ सप्टेंबर २०२५

संक्षिप्त

## विवेकानंद महाविद्यालयातील सेमिनारला प्रतिसाद

**कोल्हापूर :** अभियांत्रिकी दिनानिमित्त विवेकानंद कॉलेजमध्ये सिनिअर इलेक्ट्रॉनिक्स विभाग व बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स एन्टायर विभागातर्फे आयक्यूएसी विभागाच्या सहकार्याने आयओटी व एआयच्या युगात एम्बेडे सिस्टीम डिझाईन या विषयावर सेमीनार झाला. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. एस. ए. शिंदे उपस्थित होते. विशेष वक्ते म्हणून कौन्सिलर पुणे, राहुल हिवे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते. इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. सी. बी. पाटील यानी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. पी. आर. बागडे यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ पी. एस. जाधव यांनी केले. प्रा. जी. बी. जिरगे यांनी आभार मानले.